# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


**अतितात्काळ :**
**कालमर्यादा दि.१०/०७/२०२०**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/३३ कोटी वृक्षलागवड/२०२०/९८४६
दिनांक : 19 JUN 2020

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
असलेल्या सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका
तसेच व्यावसायिकअभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेल्या जिवंत रोपांची गणना मोबाईल / वनयुक्त शिवार ॲपव्दारे नोंदविणेबाबत.**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उपवनसंक्षक कार्यालय, पुणे वन विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र.कक्ष-३/३३ कोटी/१३८,दि.१२.०६.२०२०

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या विभागीय कार्यालयास प्राप्त झाले असून, त्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रास अनुसरुन, आपणांस कळविण्यांत येते की, सन २०१६ चे पावसाळयात २ कोटी व,क्ष लागवड, सन २०१७ चे पावसाळयात ४ कोटी वृक्ष लागवड, सन २०१८ चे पावसाळयात १३ कोटी वृक्ष लागवड त्याचप्रमाणे सन २०१९ चे पावसाळयात ३३ कोटी वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमांतर्गत पुणे विभागातील ब-याच संस्थांनी महत्वाचा सहभाग घेवून वृक्ष लागवड केलेली आहे. परंतु केलेल्या वृक्षलागवडीची माहिती वन विभागाच्या **vanyuktshivar 4.2** या मोबाईल ॲपव्दारे नोंदविणे आवश्यक असल्याचे संदर्भिय पत्राव्दारे या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

तरी सर्व संस्थाप्रमुखांना या पत्राव्दारे सूचित करण्यात येते की २, ४, १३, व ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेल्या जिवंत रोपांची, दिनांक ३१ मे, २०२० अखेर गणना करुन, या जिवंत रोपांची संख्या व टक्केवारीची माहिती **vanyuktshivar 4.2** या मोबाईल ॲपव्दारे नोंदणी पूर्ण करुन, याबाबतची माहिती **Excel Sheet मध्ये** खाली दिलेल्या प्रपत्रात या कार्यालयाच्या info.ropune@gmail.com या ई-मेल आयडी वर **Soft Copy व PDF मध्ये दिनांक १०/०७/२०२० पर्यंत न चुकता पाठविण्यात** यावी. जेणेकरुन सदरची माहिती संबंधित कार्यालयास सादर करणे शक्य होईल. ज्या संस्था याबाबतची पूर्तता करणार नाहीत अशा संस्थांची स्वतंत्र नोंद ठेवण्यात येणार आहे याची सर्व संस्थाप्रमुखांनी दक्षता घेण्यात घ्यावी.

**प्रपत्र**

| डिटीई कोड | संस्थेचे नांव | २ कोटी | | | ४ कोटी | | | १३ कोटी | | | ३३ कोटी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवड केलेल्या रोपांची संख्या | जिवंत असलेल्या रोपांची संख्या | रोपांची टक्केवारी | लागवड केलेल्या रोपांची संख्या | जिवंत असलेल्या रोपांची संख्या | रोपांची टक्केवारी | लागवड केलेल्या रोपांची संख्या | जिवंत असलेल्या रोपांची संख्या | रोपांची टक्केवारी | लागवड केलेल्या रोपांची संख्या | जिवंत असलेल्या रोपांची संख्या | रोपांची टक्केवारी |
| | | | | | | | | | | | | | |
| संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी | | | | | | | | | | | | | |

सोबत : संदर्भिय पत्राची छायांकित प्रत.

19/6/2020
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थहावर प्रदर्शित करण्यासाठी.

**महाराष्ट्र शासन**
**उपवनसंरक्षक कार्यालय, पुणे वन विभाग, पुणे**
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004

दूरध्वनी- 020 2566 0593 ई-मेल-dycfpune@gmail.com

विषय- ५० कोटी वृक्ष लागवड, कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेल्या जिवंत रोपांची गणना मोबाईल/वनयुक्त शिवार ॲपद्वारे नोंदविणेबाबत.

जा.क्र. कक्ष-३/३३ कोटी/ १३४ /सन २०२०-२१
पुणे, ४११ ००४, दि. १८ /०६/२०२०

प्रति,
सर्व यंत्रणा प्रमुख

उपरोक्त विषयांन्वये सन २०१६ चे पावसाळ्यात २ कोटी वृक्ष लागवड सन २०१७ चे पावसाळ्यात ४ कोटी वृक्ष लागवड, २०१८ चे पावसाळ्यात १३ कोटी वृक्ष लागवड, तसेच २०१९ चे पावसाळ्यात ३३ कोटी वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमांतर्गत आपले विभागाचा देखील महत्वाचा सहभाग आहे. या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांतर्गत २,४,१३ व ३३ कोटी वृक्ष लागवड, कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेल्या जिवंत रोपांची गणना दिनांक ३१ मे २०२० अखेर जिवंत रोपांची टक्केवारीची माहिती **vanyuktshivar4.2** या मोबाईल ॲपद्वारे नोंदविणे आवश्यक आहे.

तरी आपले विभागाअंतर्गत २ कोटी,४ कोटी,१३ कोटी, व ३३ कोटी वृक्ष लागवड, कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेल्या जिवंत रोपांची गणना मोबाईल/वनयुक्त शिवार ॲपद्वारे नोंदणी पूर्ण करून याबाबतची माहिती तात्काळ उपवनसंरक्षक तथा सदस्य सचिव, पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती, पुणे यांना सादर करावी.

( श्रीलक्ष्मी ए.)
उपवनसंरक्षक तथा सदस्य सचिव,
पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती, पुणे

प्रतिलिपी- जिल्हाधिकारी पुणे, तथा अध्यक्ष पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती पुणे. यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी- उपजिल्हाधिकारी (रोहयो), तथा नोडल अधिकारी पुणे जिल्हा यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

पुणे.
२८८०